


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३१७ वा | बुधवार दि ११ मार्च २०२६ | पृष्ठ ८ | किमंत३ रुपये

# सोशल मीडियावरचं प्रेम ५३ लाखांना; व्यावसायिकासोबत मोठा हनी ट्रॅप, घटनेनं पोलिसही चक्रावले

**वृत्तसंस्था/ नाशिक**

एका एखाद्या सस्पेन्स चित्रपटातील गुन्हेगारी कटाप्रमाणे व्यावसायिकाला हनी ट्रॅपमध्ये अडकवून ५३ लाखांचा गंडा घालण्यात आला आहे. सानवी खुराणा नावाच्या एका अदृश्य चेहऱ्याने तरुणाला आधी जाळ्यात ओढले. त्यानंतर गुंतवणुकीचे आमिष दाखवून क्रिप्टो करन्सीच्या नावे ५२ लाख ९३ हजार २२८ रुपयांना लुटल्याची धक्कादायक माहिती आहे. यासह नग्न व्हिडीओच्या जोरावर ब्लॅकमेल केल्याने हे प्रकरण सायबर पोलिसांत पोहोचले. या स्वरूपाचे दोन गुन्हे घडले आहेत. पोलिसांनी माहितीनुसार, दिलेल्या संशयिताने व्यावसायिक फिर्यादीसोबत व्हॉट्सॲपच्या माध्यमातून सानवी खुराणा या नावाने संपर्क साधत मैत्री व प्रेमाचे आमिष दाखविले. त्यानंतर एका बनावट क्रिप्टो ट्रेडिंग प्लॅटफॉर्मवर खाते उघडण्यास भाग पाडले. क्रिप्टो करन्सी ट्रेडिंगमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून संशयिताने फिर्यादीला विविध यूपीआय आयडी आणि बँक खात्यांवर वेळोवेळी पैसे भरण्यास प्रवृत्त केले. या गुंतवणुकीवर आभासी पद्धतीने कोट्यवधींचा नफा भासविण्यात आला. मात्र, नफा व मूळ रक्कम काढण्यासाठी कमिशनच्या नावाखाली फिर्यादीकडून तब्बल ५२ लाख ९३ हजार २२८ रुपये उकळण्यात आले. या प्रकरणी नाशिक शहर सायबर पोलिसांत संबंधित बँक खाते क्रमांक व व्हॉट्सॲप, फेसबुक प्रोफाइलविरुद्ध गुन्हा नोंद आहे. वरिष्ठ निरीक्षक संजय पिसे तपास करीत आहेत. फिर्यादीने सुरुवातीला काही पैसे गुंतविले, तेव्हा त्याला स्क्रीनवर काही कोटी रुपयांचा नफा दिसत होता. हा आकडा पाहून तो अधिकच भुलला. संशयिताने कधी ट्रेडिंग कमिशन, तर कधी टॅक्सच्या नावाखाली फिर्यादीकडून तब्बल ५३ लाखांची रक्कम उकळली. ही रक्कम भरण्यासाठी त्याने फायनान्स आणि बँकेच्या विविध खात्यांचा वापर केला. दरम्यान, तानिया शर्मा नावाच्या संशयित तरुणीने एका व्यावसायिकास ४८ लाख ५५ हजारांचा गंडा घातल्याचे काही दिवसांपूर्वीच उघड झाले होते.



जेव्हा फिर्यादीने मूळ रक्कम आणि नफा परत मागितला, तेव्हा संशयित सानवीचे रूप बदलले. संशयिताने पुन्हा ३४ लाख रुपयांची मागणी केली. पैसे देण्यास नकार देताच दोघांमध्ये संमतीने शेअर झालेले नग्न फोटो आणि खासगी व्हिडीओ संशयिताने फिर्यादीलाच पाठविले.

# गॅरेजमध्ये काम सुरू असताना तरुणांवर ॲसिड हल्ला; मेकॅनिकसह ग्राहक जखमी, काय घडलं?

**वृत्तसंस्था/ छत्रपती संभाजीनगर**

: जवाहर कॉलनी परिसरात विष्णूनगर भागात एका गॅरेजमध्ये दुचाकीचे टायर बदलण्यासाठी आलेल्या युवकासह मेकॅनिक याच्यावर ॲसिड हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत ग्राहक आणि मेकॅनिक हे दोघेही जखमी झाले. ही घटना रविवारी सकाळी अकरा वाजण्याच्या दरम्यान घडली. या ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या मेकॅनिकचे नाव सिराज नजीर शेख (वय २६, रा. भारतनगर, गारखेडा) आणि वैभव अनिलराव पुजदेकर (वय २५, रा. शेंद्रा) असे आहे. सिराज शेख हे भागीदारीत गॅरेज चालवतात. रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे ते गॅरेजवर आले होते. दरम्यान, वैभव पुजदेकर हे त्यांच्या दुचाकीचे टायर बदलण्यासाठी गॅरेजमध्ये आले होते. सिराज टायर बदलत असताना वैभव त्यांच्या उजव्या बाजूला बसलेले होते. या वेळी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या दिशेने ॲसिड फ ेकले. या हल्ल्यात सिराज यांच्या कपाळावर, गालावर, खांद्यावर, पाठीवर व डाव्या पायावर ॲसिड पडले, तर वैभव यांच्या गालावर व हातावर ॲसिड उडाले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. आरडाओरडा ऐकून स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन दोघांना उपचारासाठी घाटी रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी सिराज शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून जवाहर कॉलनी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे असून पुढील तपास सुरू आहे. ॲसिडमुळे धूर निघू लागल्याने काही काळ परिसरात शॉर्टसर्किट झाल्याचा समज झाला. त्यामुळे नागरिकांमध्ये गोंधळ उडाला. नेमके काय झाले, हे समजलेच नाही. या हल्ल्यानंतर अंगाला तीव्र जळजळ होत असल्याने त्यांनी शेजारील मिठाईच्या दुकानात धाव घेतली. तेथील नळ सुरू करून त्यांनी अंगावर पाणी घेतले आणि काही वेळ तेथेच बसून राहिल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक सचिन कुंभार यांनी घटनास्थळी भेट देऊन




परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. प्राथमिक तपासात हा हल्ला पूर्वनियोजित असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# एल मेंचोचा उदयास्त!



२२ फेब्रुवारीची पहाट. मेक्सिकोमधल्या जलिस्को येथील पर्वतरांगांमधील तपालपा हे छोटंसं गाव अजून झोपेतून जागंही झालं नव्हतं तेव्हा हेलिकॉप्टरच्या आवाजानं शांतता भंग केली. मेक्सिको सैन्याच्या विशेष पथकाचे सुसज्ज जवान एकामागोमाग तपालपाच्या जंगलात उतरू लागले, दुसरीकडे शनिवारी रात्रीपासून अन्य सैनिक एका केबिनभोवती दबा धरून बसले होते. या केबिनमधून एक महिला बाहेर आली आणि मेक्सिकोमध्ये जवळपास समांतर सरकार चालवणारा एल मेंचो आत असल्याची खात्री झाली. सैन्यानं एकाच वेळी हल्ला चढवला. मेंचोच्या सशस्त्र रक्षकांनी अत्याधुनिक शस्त्रांनी प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली. जोरदार धुमश्चक्री सुरू झाली. एव्हाना स्थानिक गोळीबाराच्या आवाजानं स्थानिक खडबडून जागे झाले होते. सैन्य पूर्ण तयारीनिशी आल्याचं लक्षात येताच, मेंचो आपल्या अगदी भरोशाच्या चार साथीदारांसह जंगलाकडे जायला निघाला. बाकीचे अंगरक्षक सैन्याला रोखून धरतील, अशी रणनीती होती. परंतु, यावेळी त्यांची कुठलीही योजना यशस्वी होणारी नव्हती. कारण अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या साह्यानं मेक्सिकोच्या लष्करानं पूर्ण तयारी व ताकदीनिशी मोहीम आखली होती. अखेर मेंचोचा गोळीने वेध घेतलाच; गंभीर जखमी झालेल्या या कुख्यात माफियाला एअरलिफ्ट करून मेक्सिको सिटीला आणलं जात असताना हवेतच त्याचा जीव गेला. नेमेसियो रूबेन ओसेगुएरा सर्व्हेंटेस ऊर्फ एल मेंचो. १७ जुलै १९६६ रोजी मेक्सिकोच्या मिचोआकान राज्यातील अगुइला या गावात एका गरीब कुटुंबात त्याचा जन्म झाला. त्याचं कुटुंब एवोकॅडोची शेती करायचं. पाच भावांसोबत वाढत असलेल्या मेंचोनं बिकट आर्थिक परिस्थितीमुळे पाचवीतच शाळेला रामराम ठोकला. गरिबीचे चटके सोसत असलेल्या मेंचोला लवकरात लवकर यातून बाहेर पडायचं होतं. त्यासाठी वयाच्या १४ व्या वर्षी त्यानं गांजाच्या शेतीची राखण करायला सुरुवात केली. मात्र, यातूनही त्याला मनासारखं उत्पन्न मिळत नव्हतं. त्यामुळे १९८०च्या दशकात तो अमेरिकेच्या कॅलिफोर्निया राज्यात बेकायदा पद्धतीने स्थलांतरित झाला. शिक्षण नसलेल्या मेंचोला झटपट पैसे कमवण्यासाठी गुन्हेगारीशिवाय दुसरा पर्याय दिसत नव्हता. वयाच्या १९व्या वर्षी सॅन फ्रान्सिस्को पोलिसांनी त्याला चोरी आणि भरलेली बंदूक बाळगल्याबद्दल अटक केली. पण श्रीमंतीचा लोभ जडलेला मेंचो मागं परतणं शक्य नव्हतं. यादरम्यान त्याचा अंमली पदार्थांचा व्यवसाय करणाऱ्या टोळीशी संपर्क आला. यातून कधी ड्रग्सविक्री, तर कधी ड्रग्सवितरणासाठी त्याला अनेकदा शिक्षा झाली. एका टप्प्यानंतर अमेरिकी पोलिसांनी त्याला मेक्सिकोमध्ये हद्दपार केलं. मेक्सिकोत परतल्यानंतर तो चक्क पोलिस दलात भरती झाला. अर्थात, तो इथं रमला नाही. काही कालावधीतच ही नोकरी सोडून तो मिलेनियो कार्टेल या ड्रगतस्कर टोळीत सामील होत पुन्हा गुन्हेगारीच्या काळ्या विश्वात परतला. झटपट श्रीमंती आणि नेतृत्वाचं जणू वेडच लागलेल्या मेंचोनं या टोळीच्या एका प्रमुखाच्या बहिणीशीच लग्न केलं आणि तो संघटित गुन्हेगारीतील एक प्रमुख माफिया बनला. १२ ऑगस्ट २००३ रोजी मिलेनियोच्या म्होरक्याला पोलिसांनी अटक केली. त्याच वेळी लॉस झेटास नावाच्या प्रतिस्पर्धी गटाने या कार्टेलवर सशस्त्र हल्ला करून टोळीचं कंबरडं मोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, अन्य गटांशी हातमिळवणी करत कोर्टेलचं काम सुरूच राहिलं. दरम्यानच्या काळात प्रमुख हस्तकांना अटक करण्यात आली, तर काहींचा चकमकीत मृत्यू झाला. या पडझडीनंतर मिलेनियो कार्टेलमध्ये फूट पडून बंडाळी उफाळून आली. दोन गट पडले. यातल्या एकाचं नेतृत्व मेंचोनं स्वतःकडे घेतलं. महत्त्वाकांक्षी मेंचोच्या कूटनीतीच्या जोरावर त्याचा गट वरचढ ठरला आणि त्यानं पश्चिम मेक्सिकोमध्ये दरारा निर्माण केला. सन २००९मध्ये या गटानं आपलं कार्टेल डे जलिस्को नुएवा जेनेरॅसिओन (सीजेएनजी) असं नामांतर केलं. साम, दाम, दंड, भेद या चतु:सूत्रीचा अवलंब करत हळूहळू ही गुन्हेगारीविश्वातील अतिशय शक्तिशाली आणि क्रूर टोळी म्हणून उदयास आली. मेंचोने भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून सीजेएनजीचा वेगाने विस्तार केला. उघड हिंसाचार, सुरक्षा दलांवार थेट हल्ले आणि अन्य टोळ्यांच्या पतनामुळे अल्पावधीच ही मेक्सिकोतील एक आघाडीची गुन्हेगारी टोळी आणि मेंचो मोस्ट वाँटेड माफिया बनला. त्याने छोट्या-मोठ्या टोळ्यांना चिरडून आपलं काळं साम्राज्य अधिक प्रबळ केलं आणि जलिस्कोसह लगतच्या राज्यांमध्ये घट्ट पाय रोवले. कोकेन, मेथाम्फेटामाइन आणि फेंटानिलसारख्या अंमली पदार्थांची तस्करी हा सीजेएनजीचा मुख्य व्यवसाय. जलिस्को राज्य या कार्टेलचा मुख्य तळ. इथूनच ते मेक्सिकोसह अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, युरोप, आफ्रिकासारख्या जगभरातील २८हून अधिक देशांमध्ये अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात तस्करी करत. एक शक्तिशाली ड्रग्ज डीलर बनू लागताच मेंचोनं पाणबुड्यांमध्ये मोठी गुंतवणूक करण्यास सुरुवात केली.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुलुंड डम्पिंग ग्राऊंडच्या रिकाम्या होणाऱ्या जागेवर १० एकरात कर्करोग रुग्णालय उभारा; नार्वेकरांचे पत्र

**मुंबई :** मुलुंड डम्पिंग ग्राऊंडच्या रिकाम्या होणाऱ्या जागेवर जागतिक दर्जाचे रुग्णालय उभारावं, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिव आणि विधानपरिषदेतील आमदार मिलिंद नार्वेकर यांनी केली आहे. याबाबत नार्वेकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिलं आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी असली तरी शहरातील कर्करोग उपचारासाठीच्या सुविधांवर ताण असल्याने नव्या कर्करोग रुग्णालयाची आवश्यकता असल्याचं आमदार नार्वेकर म्हणाले.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात मिलिंद नार्वेकर यांनी म्हटलं की, 'मुलुंड येथील पुनर्प्राप्त सुम रे ६० एकर भूखंडाच्या भविष्यातील



वापराबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही आणि सध्या केवळ व्यवहार्यता अभ्यास सुरू असल्याची स्पष्टता सभागृहात दिल्याबद्दल शासन व महापालिकेचे आभार. या मोठ्या आणि महत्त्वाच्या जागेचा विचार करताना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना नम्र विनंती आहे की या जागेच्या काही भागावर जागतिक दर्जाचे कर्करोग उपचार केंद्र उभारण्याचा गंभीरपणे विचार करावा,' असं मत नार्वेकर यांनी म ांडलं आहे.दरम्यान, 'रिलायन्स फाऊंडेशन, टाटा ट्रस्ट किंवा गोदरेज ग्रुप यांसारख्या परोपकारी संस्थांच्या सहकार्याने १० एकर जागेवर जागतिक दर्जाचे कर्करोग रुग्णालय उभारले तर ते मुंबईसह संपूर्ण चचट आणि महाराष्ट्रासाठी मोठी आरोग्यसेवा ठरेल,' असंही मिलिंद नार्वेकर यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे. या पत्राबाबत सोशल मीडियावर माहिती देताना मिलिंद नार्वे कर यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या आजच्या अंकातील वृत्ताचाही दाखला दिला आहे.मुलुंड डम्पिंग ग्राऊंडवर गोल्फ कोर्स उभारण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नसल्याचे राज्य सरकारने विधान परिषदेत दिलेल्या उत्तरात स्पष्ट केले आहे. या डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून जमीन पुनर्प्राप्त करण्यात येत असून त्याचे ७८.६३ टक्के काम पूर्ण झाल्याचेही सरकारने म्हटले आहे. तसेच या जागेच्या वापराबाबत नागरिकांकडून मुंबई महापालिकेला विनंती अर्ज प्राप्त झाल्याचेही सांगण्यात आले.

आमदार नार्वेकर यांनी ६० एकर परिसरात असलेले मुलुंड डम्पिंग ग्राऊंड वर्ष २०२६ मध्ये बंद होणार आहे का, तो बंद झाल्यानंतर त्या ठिकाणी गोल्फ कोर्स उभारण्याच्या प्रस्तावाला स्थानिकांचा विरोध असून त्या ठिकाणी रुग्णालय उभारावे अशी मागणी केली आहे का, असे प्रश्न उपस्थित केले होते. त्यावर नगरविकास मंत्री या नात्याने एकनाथ शिंदे यांच्याकडून उत्तर देण्यात आले.

## अजित पवारांच्या नावे संस्था-स्मारके बांधण्याआधी पूर्व परवानगी बंधनकारक

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिवंगत नेते आणि महाराष्ट्राचे माजीउपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे विमान अपघातात निधन झाल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर राज्यभरात त्यांच्या स्मृती जपण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. या पार्श्वभूमीवर, अजित पवार यांच्या नावे संस्था, ट्रस्ट, फाउंडेशन नोंदणी किंवा सार्वजनिक ठिकाणी पुतळे व स्मारके उभारण्यापूर्वी त्यांच्या कुटुंबीयांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करावे, असे प्रसिद्धीपत्रक उपमुख्यमंत्री कार्यालयाकडून काढण्यात आले आहे.अजित पवार यांचे सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदान मोठे असून जनमानसात त्यांच्याविषयी आदराची भावना आहे. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी अनेक जण संस्था, ट्रस्ट किंवा स्मारके उभारण्याचा विचार करत आहेत. त्यांच्या नावाचा चुकीचा किंवा व्यावसायिक वापर होण्याची शक्यता आहे.दिवंगत अजित दादांच्या नावाने कोणतीही नवीन संस्था, ट्रस्ट किंवा फाउंडेशन नोंदणी करताना कुटुंबीयांची लेखी 'ना हरकत' प्रमाणपत्र



घेणे अनिवार्य करावे, तसेच सार्वजनिक ठिकाणी त्यांचे पुतळे किंवा स्मारके उभारण्याबाबत सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे. वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, जागेच्या मालकी हक्काचा प्रश्न उद्भवणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.अजित पवार यांच्या नावाचा वापर करून अनधिकृत निधी गोळा करणाऱ्या किंवा संशयास्पद कामकाज करणाऱ्या संस्थांची सखोल चौकशी करावी. आधीपासून अस्तित्वात असलेल्या संस्थांनी नाव बदलून स्व. अजित दादा पवार यांचे नाव लावण्याचा प्रयत्न केल्यास त्यांनाही हेच नियम लागू करावेत, असेही याबाबतच्या पत्रकात नम ूद करण्यात आले आहे.

## रायगडमध्ये शिंदे गटाचे सर्वाधिक सदस्य, NCP-BJP कडून विजयी मिरवणुकीची तयारी

**रायगड :** पालकमंत्री पदावरुन असो किंवा निवडणुकीतील प्रचारात रायगडमध्ये महायुतीत अनेकदा खदखद पाहायला मिळते ती . शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात तेथे फारसे सख्य नसल्याचे दिसते. जिल्हा परिषद निवडणुकीत शिंदे गटाला सर्वाधिक एकवीस सदस्य निवडून आले आहेत, तरीही सध्याच्या राजकीय समीकरणानुसार त्यांना विरोधी बाकावर बसावे लागू शकते. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भाजप सत्तास्थापन करणार असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे की, जरी शिंदे गटाचे सदस्य संख्यात्म क दृष्ट्या सर्वाधिक असले तरी, पक्षांमधील युती, सामंजस्य आणि धोरणात्मक निर्णय यामुळे सत्तेवर त्यांचा पूर्ण प्रभाव राहणार नाही. २०१९ च्या विधान सभा निवडणुकीमध्ये जेव्हा भाजपचे सर्वाधिक १०५ आमदार निवडून आले होते, तरीही राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि काँग्रेस यांच्यामुळे महाआघाडी स्थापन झाली आणि उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री झाले होते. त्या वेळी सर्वाधिक आमदार असलेला पक्ष विरोधी बाकावर बसला होता, असा अनुभव रायगडमध्ये शिंदे गटाला येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील अनेक प्रमुख नेते रायगडमध्ये उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळाली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, मंत्री नितेश राणे, आशिष शेलार, प्रवीण दरेकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष



धैर्यशील पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, आमदार रविशेठ पाटील तसेच माजी आमदार अनिकेत तटकरे हे देखील उपस्थित राहणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या निवडीला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड झाल्यानंतर विजयी उम ेदवारांची भव्य मिरवणूक अलिबाग शहरातून काढण्यात येणार असून, त्यानंतर सायंकाळी साडेचार वाजता अलिबाग समुद्र किनारी भाजप-राष्ट्रवादी युतीची विजयी सभा आयोजित करण्यात आली आहे. सभेसाठी भव्य मंडप उभारण्याचे काम सुरू असून कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे.

# शेतकरी कर्जमाफी अन पायाभूत सुविधा दोन्ही फसव्या

### जयंत पाटलांची राज्याच्या अर्थसंकल्पावर टीका

**मुंबई :** राज्यावरचा चार लाख कोटींचा कर्जाचा बोजा ११ लाख कोटी झाला. पण, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीमध्ये काहीही वाढ झालेली नाही. राज्य सरकार ' पायाभूत' ची मलाई खाण्यात जास्त रस ठेवत आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जयंत पाटील यांनी मंगळवारी विधानसभेत केली.मुख्यमंत्र्यांनी सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पातील कर्जमाफी आणि पायाभूत सुविधा या दोन्ही फसव्या आहेत. २०१९ मध्ये आम च्या आघाडी सरकारने पहिला निर्णय हा शेतकरी कर्जमाफीचा घेतला होता. त्यावेळी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात आली होती. आज सात वर्षांत पुन्हा आपण तिथेच आहोत, असेही पाटील यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे त सहभागी होताना पाटील यांनी अर्थसंकल्पाची चिरफाड करीत सरकारच्या धोरणांवर हल्ला चढवला.



राज्याचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प हा 'भ्रमाचा दस्तऐवज' आहे.शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, अशी घोषणा तुम्ही सत्तेत येण्यासाठी केली होती. शेतकऱ्याला कर्जातून पूर्णपणे मुक्त करायचे अशी घोषणा होती. परंतु, आता, या अर्थसंकल्पात दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफ करण्याची घोषणा झाली आहे. महागाई फक्त शेतकऱ्यांसाठी नाही तर सर्वांसाठी आहे. राज्यातील सर्व सहकारी बँकांकडून ९ मार्च २०२६ पर्यंत नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती मागवली गेली आहे. ही तारीख चुकीची आहे. कारण, नियमित कर्ज भरणारा शेतकरी ३१ मार्चपर्यंत कर्ज भरतो.

याचा अर्थ तुम्ही प्रामाणिक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यालासुद्धा तुम्ही प्रामाणिकपणे पैसे देऊ इच्छित नाही, असे पाटील म्हणाले. २०२१-२२ मध्ये ५.७६ लाख कोटी रुपये असलेले राज्याचे कर्ज आता ११ लाख कोटी रुपयांहून अधिक झाल्याचे सांगत कर्ज झपाट्याने वाढत असल्याचेही पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणले.अर्थसंकल्पातील ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य अवास्तव असल्याचे सांगत पाटील म्हणाले, की राज्याची अर्थव्यवस्था २०२४ पर्यंत सुमारे ५.५ ट्रिलियन डॉलर (सुमारे ४५० लाख कोटी रुपये) करण्याचे लक्ष्य सरकारने ठेवले आहे. मात्र, सध्या राज्याचा विकासदर केवळ ०.५५ ट्रिलियन डॉलर (५० लाख कोटी रुपये) आहे. ५.५ ट्रिलियन डॉलर लक्ष्य गाठण्यासाठी पुढील २१ वर्षे दरवर्षी राज्याचा विकासदर ११.५ टक्के आवश्यक आहे. प्रत्यक्षात गेल्या वर्षी विकासदर ७.३ टक्के होता आणि २०२५-२६ साठी तो ७.९ टक्के अंदाजित आहे, याकडे लक्ष वेधत जयंत पाटील यांनी सरकारच्या घोषणा आणि कृती मोठे अंतर असल्याचे सांगितले.

# जामखेडमध्ये सागर मोहळकरवर गोळीबार प्रकरणात कारवाई; मुख्य आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**अहिल्यानगर :** जामखेड शहरातील तपनेश्वर रोड ते खाडेनगर मार्गावरील नुराणी कॉलनी परिसरात पैलवान सागर किसन मोहळकर याच्यावर झालेल्या थरारक गोळीबार प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आलं आहे. आरोपीकडून गावठी कट्टा, एक जिवंत काडतूस, विनानंबर दुचाकी आणि मोबाईल असा सुमारे ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ मार्चला सायंकाळी साडेसातच्या सुमारास मोटारसायकलवरून आलेल्या अज्ञात आरोपींनी सागर मोहळकर यांच्यावर गावठी कट्ट्यातून गोळीबार करून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी किसन चांगदेव मोहळकर



(रा. जांबवाडी, ता. जामखेड) यांच्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०९(१) तसेच आर्म अ‍ॅक्ट ३/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.घटनेनंतर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी घटनास्थळी भेट देत तपासाची सूत्रे हाती घेतली. पूर्ववैमनस्यातून हा हल्ला झाल्याची शक्यता गृहित धरून आरोपींचा शोध घेण्यासाठी एलसीबीची दोन पथके तयार करण्यात आली. तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पोलिसांनी जिक्री (ता. जामखेड) येथील शिवारात सापळा रचून अभिमन्यु महादेव पोते (वय २४, रा. भुतवडा रोड, जामखेड) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपल्या साथीदारांसह हा कट रचल्याची कबुली दिली.पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, चार्ली उर्फ माऊली उर्फ ज्ञानेश्वर साठे, रोहित विठ्ठल आखाडे आणि चिन्या (पूर्ण नाव अज्ञात) हे तिघे आरोपी सध्या फरार आहेत. ते कोथरुड, पुणे परिसरातील असल्याचे समोर आले आहे. या आरोपींनीच सागर मोहळकर यांच्या हालचालीची माहिती मिळाल्यानंतर त्यांच्यावर गोळीबार केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून ३५ हजार रुपयांचा गावठी कट्टा, एक जिवंत काडतूस, ४० हजार रुपयांची विनानंबर ज्युपिटर दुचाकी आणि १५ हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फरार आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास जामखेड पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी आणि त्यांच्या पथकाने केली.

## ४० वर्षीय व्यक्तीन घरात आयुष्याची दोर कापली ; दुर्गंधी आल्याने घटना उघड

**जालना :** जालना शहरातील कन्हैयानगर परिसरात एका ४० वर्षीय व्यक्तीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची मोठी घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, ही घटना अंदाजे २ ते ३ दिवसांपूर्वी घडली असावी, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. घरातून दुर्गंधी आल्यानं ही बाब नागरिकांच्या लक्षात आली आणि त्यानंतर हा प्रकार समोर आला.मृत व्यक्तीचं नाव राजेश प्रकाश चव्हाण (वय ४०) असं असून ते कन्हैयानगर परिसरात राहत होते. ते विवाहित असून काही दिवसांपासून ते पत्नीपासून वेगळे राहत असल्याची माहिती मिळाली आहे. दोन ते तीन दिवसांपूर्वी त्यांचे कुटुंबीय लग्नकार्याकरिता बाहेरगावी गेले होते. त्यादरम्यान घरात कोणीही नसल्याचा फायदा घेत राजेश चव्हाण यांनी घरात साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.घरात कोणी नसल्यामुळे ही घटना तात्काळ कोणाच्या लक्षात आली नाही.



मात्र, काल सोमवारी परिसरात दुर्गंधी येऊ लागल्याने नागरिकांना संशय आला. याबाबत माहिती मिळताच चंदनझिरा पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीस कर्मचारी आणि पंचांच्या उपस्थितीत दरवाजा उघडून पाहणी करण्यात आली असता राजेश चव्हाण यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यानंतर मृतदेह खाली उतरवून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक सुशील चव्हाण यांनी दिली. या घटनेमुळे कन्हैयानगर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## गर्लफ्रेंडकडून धावत्या मुंबई लोकलमधून उडी

**नवी मुंबई :** प्रियकराने फोनवरुन संपर्क तोडल्याच्या रागातून एका २० वर्षीय तरुणीने चालत्या लोकलमधून खाडीत उडी मारल्याची धक्कादायक घटना आज सकाळी घडली. सुदैवाने, तेथील मच्छीमारांनी प्रसंगावधान दाखवत तात्काळ मदत केल्यामुळे या तरुणीचा जीव वाचला. ही घटना सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास वाशी क्रिक या पुलावर घडली असून परिसरात एकच खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी चेंबूर येथील रहिवासी आहे. ती हार्बर मार्गावरील लोकलने प्रवास करत असताना लोकल ट्रेन वाशी खाडी पुलावर आली. याचवेळी रागाच्या भरात तिने लोकलच्या दरवाजातून थेट खाडीत उडी घेतली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे प्रवाशांमध्येही भीतीचं वातावरण पसरलं. मात्र, तिच्या खांद्यावर असलेल्या बॅगमध्ये हवा भरल्याने ती पाण्यावर तरंगत राहिली. दरम्यान, ही घटना पाहताच वाशी गावातील मच्छीमारांनी तात्काळ धाव घेतली. मच्छीमार महेश सुतार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बोट घेऊन काही मिनिटांत त्या ठिकाणी पोहोचत तरुणीला पाण्यातून बाहेर काढले.

## टॅक्सी चालकाला संपवल्यानंतर विद्यार्थ्याचे वकिलाला अनेक कॉल ; पोलीस साशंक

**ठाणे :** कॅब ड्रायव्हरचा जीव घेतल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेला २१ वर्षीय इंजिनिअरिंग विद्यार्थी आदर्श भालेराव याने पाच मार्च रोजी परतीच्या प्रवासादरम्यान वकिलाला अनेक फोन केल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीने स्वसंरक्षणाच्या प्रयत्नात टॅक्सी चालकाचा जीव घेतल्याचा केलेला दावा पटण्यासारखा नाही, असंही पोलीस म्हणाले. आरोपी आदर्श भालेराव याने वकिलाशी सल्लामसलत केल्यानंतर स्वसंरक्षणाचा सिद्धांत तयार केला असावा असा पोलिसांना संशय आहे.सुरुवातीला या प्रकरणाचा तपास ठाणे (ग्रामीण) पोलिस करत होते. मात्र नवी मुंबई येथील रहिवासी असलेल्या चालक नासिर अहमदची बॉडी पुणे (ग्रामीण) पोलिसांच्या हद्दीत येणाऱ्या माळशेज घाटाजवळ सोमवारी आढळल्यानंतर हा तपास पुणे (ग्रामीण) पोलिसांकडे वर्ग करण्यात आला.

मयत टॅक्सी चालक नासिर अहमदच्या कुटुंबीयांनी ५ मार्च रोजी रबाळे पोलिस ठाण्यात तो बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली होती. दोन दिवसांनी मोटारचालकांना त्याचं पार्थिव सापडलं होतं.पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, आदर्श भालेरावने गुरुवारी जुन्नरला जाण्यासाठी अहमदची कॅब भाड्याने घेतली होती. तिथून तो एका मित्राला भेटण्यासाठी पुण्याला बसने जाण्याचा विचार करत होता. आदर्शला टिटवाळा येथून अटक करणाऱ्या पथकाचा भाग असलेल्या ठाणे (ग्रामीण) पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपीने प्रवासादरम्यान वकिलाला अनेक फोन केले. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भात वृत्त दिले आहे.जेव्हा आम्ही आदर्शचा कॉल रेकॉर्ड तपासला, तेव्हा आम्हाला आढळलं की प्रवासादरम्यान कॅबमध्ये काही वेळ घालवल्यानंतर त्याने एका वकिलाला अनेक कॉल केले. तो त्या वकिलाला कसा ओळखत होता, हे आम्हाला माहित नाही‘ असं पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं.

# हातात दिला चॉकलेट बॉक्स, पण आत निघाला ८.७१ कोटींचा गांजा

**पुणे :** पुणे विमानतळावर एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नोकरीचं आमिष देवून काही तरुणांना विदेशात बोलावलं होतं. पण तिथे त्याना नोकरी मिळाली नाही. त्यानंतर या तरुणांना घर परत पाठवल्यावर त्यांच्याकडे चॉकलेटचे बॉक्स देण्यात आले. या तरुणांना विमानतळावर प्रशासनाने अडवले आणि त्यांची तपासणी केली असता, त्यांच्याकडे बॉक्स आढळले. संबंधित बॉक्स हे चॉकलेट बॉक्स असल्याचं त्यांनी सांगितलं. पण अधिकाऱ्यांनी ते बॉक्स उघडले असता त्यामध्ये कोट्यवधी रुपयांचा गांजा आढळला. त्यामुळे अधिकारी देखील विचारात पडले. या प्रकरणाची गंभीर दखल अधिकाऱ्यांनी घेतली आहे. पुणे विमानतळावरच्या या





घटनेची आता सर्वत्र चर्चा होत आहे. नोकरीच्या आमिषाने बँकॉकला गेलेले चार जण परतताना चॉकलेटचे बॉक्स घेऊन आले. पण त्या बॉक्समध्ये चॉकलेट नव्हतंच. आत होता तब्बल ८.७१ कोटी रुपयांचा हायड्रोपोनिक गांजा! पुणे विमानतळावर एअर इंटेलिजन्स युनिटने ही मोठी कारवाई करत ५ जणांना ताब्यात घेतलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चार प्रवासी बँकॉकहून पुण्यात विमानाने आले. विमानतळावर तपासणीदरम्यान त्यांच्या बॅगमध्ये संशयास्पद चॉकलेटचे बॉक्स आढळले. अधिकाऱ्यांनी बॉक्स उघडून पाहिल्यावर धक्काच बसला. चॉकलेटच्या ऐवजी आत व्यवस्थित पॅक करून हायड्रोपोनिक गांजा लपवून ठेवण्यात आला होता.तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, या चौघांना बँकॉकमध्ये नोकरी मिळेल असे सांगून बोलावण्यात आले होते. मात्र तिथे गेल्यावर ङ्गनोकरीची संधी नाहीङ्ग असं सांगितलं गेलं. परतीच्या प्रवासात त्यांना प्रत्येकी एक चॉकलेटचा बॉक्स देण्यात आला आणि तो पुण्यात घेऊन जाण्यास सांगितलं. त्यांना आत काय आहे याची कल्पनाही नव्हती, असा प्राथमिक अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.दरम्यान, पुणे विमानतळावर या चौघांना घेण्यासाठी आलेल्या आणखी एका व्यक्तीलाही ताब्यात घेण्यात आले आहे. ही व्यक्ती रत्नागिरी जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे. तर विमानाने आलेले चारही जण झारखंडमधील असल्याचं सांगितलं जात आहे. या कारवाईत एकूण ८.७१ कोटी रुपयांचा हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला आहे. पुणे विमानतळावर यंदाच्या वर्षातील ही सर्वात मोठी ड्रग्ज कारवाई मानली जात आहे. एअर इंटेलिजन्स युनिटकडून सध्या या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून या तस्करीमागे नेमकं कोणतं मोठं रॅकेट आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

# आखाती युद्धाच्या आयपीएलला झळा, एका मॅचसाठी २५०० लीटर डिझेलची गरज



**मुंबई :** आखाती युद्धामुळे युरोप, अमेरिका अर्थातच पश्चिमेकडील देशांतून येणाऱ्या परदेशातील क्रिकेटपटूंच्या प्रवासावर परिणाम होऊ शकतो. एवढेच नव्हे, तर एलपीजीचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत असल्याचा हॉटेल उद्योगांवर विपरीत परिणाम होत आहे. त्यातच डिझेलचे भाव सातत्याने वाढत असल्याचेही आव्हान असेल, त्याचबरोबर या युद्धामुळे जाहिरातीच्या उत्पन्नावरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले. वर्ल्ड कप स्पर्धेची सांगता झाल्यानंतर भारताच्या पश्चिमेस असलेल्या देशातील खेळाडूंच्या (इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, झिम्बाब्वे) प्रयाणाचा प्रश्न निर्माण झाला होता. आंतरराष्ट्रीय संघ असल्यामुळे या संघाच्या प्रयाणासाठी चार्टर विमानाची सोय करण्यात आली होती. मात्र, आयपीएल खासगी आहे. त्यामुळे संबंधित देशांतील खेळाडूंच्या प्रवासासाठी चार्टर विमानाची सोय होणार नाही, याचा परिणाम खेळाडूंच्या आगमनावर मोठ्या प्रमाणावर होऊ शकेल. तूर्तास अफगाणिस्तानमधील ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, श्रीलंका; तसेच खेळाडूंच्या सहभागाचा प्रश्न येणार नाही, असे सांगितले जात आहे. सध्या काही प्रमाणात विमानसेवा सुरू आहे. मात्र, त्यात कधीही प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे.सर्वांत मोठा प्रश्न एलपीजीच्या टंचाईचा आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने याचा पुरवठा कमी होत असल्यामुळे त्याच्यावर निर्बंध घातले आहेत. त्यामुळे अनेक हॉटेल व्यावसायिकांनी खाद्यपदार्थ कमी केले आहेत, त्याचबरोबर काही हॉटेलनी आपली आस्थापने बंद करण्याबाबतही विचार सुरू केला आहे. ही हॉटेल प्रामुख्याने देशाच्या मुख्य महानगरातील आहेत. त्यातही हा प्रश्न मुंबई, दिल्ली, चेन्नई आणि बेंगळुरू येथे जास्त असल्याचे चित्र आहे. याच शहरात आयपीएलच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असते. सरकार अर्थातच हॉटेलऐवजी रुग्णालये; तसेच शैक्षणिक संस्थांना इंधन पुरवठा करण्यात प्राधान्य देईल. या परिस्थितीत आतिथ्यक्षेत्रावर होणाऱ्या प्रतिकूल परिणामाचा फटका आयपीएलला बसेल. 'आमचे सर्व घडामोडींवर लक्ष आहे. रोज परिस्थिती बदलत आहे. त्यामुळे आत्ताच कोणताही अंदाज व्यक्त करणे योग्य होणार नाही. आम्ही योग्य वेळी निर्णय घेऊ,' असे आयपीएलचे प्रशासकीय प्रमुख अरुण धुमळ यांनी सांगितल्याचे वृत्त आहे.दरम्यान, आयपीएलमधील ९० टक्के खेळ विद्युतझोतात होत असतो. दुपारी तीनची लढत असली तरीही सामन्याची सांगता विद्युतझोतात होत असते. एका आयपीएल सामन्यासाठी किमान दोन ते अडीच हजार डिझेल लागते. त्याशिवाय सरावाच्या वेळीही जनरेटरचा वापर होतो. युद्धामुळे हे डिझेल उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतो. गुवाहाटी (डॉ. भूपेन हझारिका स्टेडियम), बेंगळुरू (चिन्नस्वामी स्टेडियम), कटक (बाराबती स्टेडियम) येथे डिझेलच्या जनरेटरचा वापर होतो.आयपीएलचे सहपुरस्कर्ते, तसेच काही संघाचे सहपुरस्कर्ते पश्चिम आखातामधील कंपन्या आहेत. त्या कंपन्या पुरस्कृत राहण्याबाबत फेरविचार करू शकतात. त्यामुळे आयपीएलच्या उत्पन्नातही घट होऊ शकेल, असा अंदाज व्यक्त होत आहे.

## ढोल-ताशे, औक्षण.. वर्ल्ड चॅम्पियन सूर्याची रॉयल एन्ट्री ; मराठीतून साधला संवाद



**मुंबई :** सूर्यकुमार यादव च्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने फायनल सामन्यात न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव केला. भारतीय संघाने तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावले. या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष करून भारतीय खेळाडू आता आपापल्या घरी परतले. भारताला विश्वचषक जिंकून देणारा सूर्यकुमार यादव तिसरा कर्णधार ठरला. आता हा विश्वविजेता कर्णाधाराचे मोठ्या जल्लोषात मुंबईतील निवास्थानी स्वागत केले गेले.सूर्या हा मुंबईत चेंबूरमध्ये राहतो. त्यामुळे निवासस्थानी पोहोचताच सूर्याचे मराठमोळ्या पद्धतीने स्वागत केले आले. सर्नप्रथम सूर्याचे औक्षण करण्यात आले, त्यानंतर शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सूर्याचा सत्कार केला गेला. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'सूर्या-सूर्या'च्या जयघोषात विश्वविजेताचे स्वागत करण्यात आले. यावेळी सूर्यानेही चाहत्यांसोबत फोटो काढले, बॅटवर ऑटोग्राफ दिला. पीटीआयशी बोलताना सूर्या म्हणाला की, '२०२४ आणि २०२६ मध्ये लागोपाठ ट्रॉफी जिंकणे हे एक स्वप्न आहे. देशात विश्वचषक जिंकणे हे आमचे स्वप्न होते आणि ते पूर्ण झाले आहे. आमचे पुढील ध्येय भारतीय ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचे आहे. देशात जास्तीत जास्त ट्रॉफी जिंकण्याचे माझे प्रयत्न आहेत.' सूर्याने चक्क मराठीत संवाद साधून सर्वांची मने जिंकली. सूर्या म्हणाला, ङ्गमाझा क्रिकेटचा प्रवास हा चेंबूरमधून सुरू झाला होता, त्यामुळे विश्वचषक जिंकून इथे परतण येणे खूप छान वाटतंय.

## फायनल मॅचमधील आक्रमकता अर्शदीप सिंगला नडली ; आयसीसीची दंडात्मक कारवाई



**मुंबई :** अहमदाबादच्या मैदानावर भारतीय संघाने टी-२० विश्वचषक जिंकला. सलग दुसरी वेळ आहे जेव्हा भारतीय संघाने विश्वचषक जिंकला. आता यानंतर सगळेच खेळाडू सेलिब्रेशन करत आहे. भारतीय संघाचीतल एका खेळाडूवर कारवाई होणार आहे. आयसीसीकडून आता खेळाडूवर एक्शन घेणार असून त्याला मोठ्या प्रमाणात दंड ठोठावला जाईल.भारतीय वेगवान गोलंदाज अींहवशर्शा डळपसह आयसीसीने दंड ठोठावला आहे. ढ२० थेींश्रव उीं २०२६ अंतिम सामन्यादरम्यान त्याने किवी फलंदाज डॅरिल मिशेलवर आक्रमक चेंडू टाकला होता, ज्यामुळे मैदानावरील वातावरण काही काळासाठी तापले होते. अर्शदीप सिंगला त्याच्या कृतीबद्दल आयसीसीने त्याच्या सामन्याच्या मानधनाच्या १५ टक्के दंड ठोठावला आहे. ८ मार्च रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या टी२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने विजेतेपद मिळवले आणि विजेतेपद मिळवले.अर्शदीप सिंगला खेळाडू आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.९चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळले, जे आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान खेळाडूवर, त्याच्या दिशेने किंवा धोकादायक पद्धतीने चेंडू फेकण्याशी संबंधित आहे. दंडाव्यतिरिक्त, अर्शदीपच्या शिस्तभंगाच्या रेकॉर्डमध्ये एक डिमेरिट पॉइंट जोडण्यात आला. गेल्या २४ महिन्यांतील हा त्याचा पहिलाच गुन्हा होता.२०२६ च्या टी२० विश्वचषक फायनलमध्ये न्यूझीलंडच्या डावाच्या ११ व्या षटकात अर्शदीप सिंग त्याचा दुसरा षटक टाकण्यासाठी आला तेव्हा ही घटना घडली. या षटकात डॅरिल मिशेलने अर्शदीपच्या गोलंदाजीवर दोन षटकार मारले, ज्यामध्ये त्याच्या समोरून जाणारा एक शॉटही होता. अर्शदीपने चेंडू उचलला आणि त्याच्या दिशेने आक्रमकपणे फेकला. चेंडू विकेटपासून खूप दूर होता आणि मिशेलच्या खांद्यावर आदळला, ज्यामुळे काही क्षण मैदानावर जोरदार वाद झाला. डॅरिल मिशेल संतापला आणि त्याने ताबडतोब पंचांकडे तक्रार केली. दोन्ही खेळाडूंमधील वाद वाढत असल्याचे पाहून, पंच आणि सूर्यकुमार यादव यांना परिस्थिती शांत करावी लागली. षटकानंतर अर्शदीप सिंगने मिशेलची माफी मागितली.

## वर्ल्ड कप जिंकला आता बोहल्यावर चढणार कुलदीप यादव ; लग्नाची तारीख आली



**मुंबई :** सलग दोन टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर, भारतीय फिरकी गोलंदाज घींश्रवशर्शा धरवरीं लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा भाग असलेला कुलदीप यावेळीही चॅम्पियन संघाचा भाग होता. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारताने न्यूझीलंडला हरवून तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावले आणि सर्वाधिक टी-२० विश्वचषक जिंकणारा देश बनला. शिवाय, घरच्या मैदानावर एखाद्या देशाने विजेतेपद जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे.मीडिया रिपोर्ट्सनुसार, कुलदीप आणि वंशिकाचे लग्न मूळतः नोव्हेंबर २०२५ मध्ये होणार होते. कुलदीपने त्याच्या संघाला प्राधान्य देण्यासाठी लग्न पुढे ढकलले. त्याचे एकमेव लक्ष २०२६ च्या आयसीसी टी-२० विश्वचषकमध्ये भारताला विजय मिळवून देण्यावर होते. कुलदीपचे दीर्घकालीन प्रशिक्षक कपिल देव पांडे यांनी पुष्टी केली आहे की लग्नापूर्वीच्या विधी १३ मार्चपासून सुरू होतील. मसुरी येथील एका रिसॉर्टमध्ये हळदी आणि मेहंदी समारंभाने उत्सव सुरू होतील.कुलदीप आणि वंशिकाचे खूप जुने नाते आहे. ते दोघेही उत्तर प्रदेशातील कानपूरचे रहिवासी आहेत आणि त्यांची घरे फक्त ३ किलोमीटर अंतरावर आहेत. एकमेकांना बराच काळ ओळखल्यानंतर, गेल्या वर्षी लखनौमधील एका हॉटेलमध्ये या जोडप्याचा साखरपुडा झाला. वंशिका सध्या ङखउ मध्ये कर्मचारी म्हणून काम करते. क्रिकेटच्या झगमगाटापासून दूर राहिलेले वंशिका आणि कुलदीप हे जोडपे सोशल मीडियावर बरेच चर्चेत आहेत.भारतीय संघाने स्पर्धेत वर्चस्व गाजवले, परंतु कुलदीप यादवला अंतिम अकरा खेळाडूंमध्ये फक्त एकदा संधी मिळाली. त्याने संपूर्ण स्पर्धेत फक्त एकच सामना खेळला, गट टप्प्यात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध. त्या सामन्यात, कुलदीपने त्याच्या जादुई गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले, ४ षटकांमध्ये फक्त १४ धावा देऊन १ बळी घेतला.कुलदीप यादवचा लग्न हा एक स्टार स्टड्ड इव्हेंट असणार आहे. अलिकडेच, कुलदीपचे वडील राम सिंग यादव यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची भेट घेतली आणि त्यांना वैयक्तिकरित्या आमंत्रित केले. बीसीसीआय उच्च अधिकारी, कर्णधार सूर्यकुमार यादवसारखे सध्याचे खेळाडू आणि अनेक माजी क्रिकेट दिग्गज लखनौमधील लग्न आणि रिसेप्शनमध्ये उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. याबाबत कोणतेच अधिकृत विधान समोर आलेले नाही.

# दारू पिऊन मारलं, पैसे हिसकावले, उपाशी ठेवलं; प्रसिद्ध क्रिकेटरविरोधात पत्नीचे गंभीर आरोप..



**मुंबई :** आयपीएलच्या माजी क्रिकेटपटूवर पत्नीनेच गंभीर आरोप केले आहेत. या क्रिकेटपटूविरोधात तिने न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. दारू पिऊन मारहाण, मॉडेलिंगमधून कमावलेले पैसे हिसकावून घेणं आणि हुंडा मागणं यांसारखे गंभीर आरोप तिने केले आहेत. आयपीएल क्रिकेटपटू अमित मिश्रा आणि त्याच्या कुटुंबीयांविरुद्ध उत्तर प्रदेशातील कानपूर इथल्या एका ३५ वर्षीय मॉडेलने न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. गरिमा तिवारी असं या मॉडेलचं नाव असून तिने हुंड्यासाठी शारीरिक, म नसिक छळ, मारहाण आणि आत्महत्येस प्रवृत्त करण्याचे गंभीर आरोप केले आहेत. गरिमाने अतिरिक्त दिवाणी न्यायाधीशांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. लग्नानंतर पती आणि त्याच्या कुटुंबीयांकडून सतत शारीरिक आणि मानसिक छळ सहन करावा लागत असल्याचं तिने तक्रारीत म्हटलंय. अमित मिश्रा याच्यासोबतच तक्रारीत त्याची आई बिना मिश्रा, वडील शशिकांत मिश्रा, भाऊ अमर मिश्रा, मेहुणी रितू मिश्रा आणि बहीण स्वाती मिश्रा यांचाही सहआरोपी म्हणून उल्लेख करण्यात आला आहे.


पत्रकारांशी बोलताना गरिमा म्हणाली, ङ्गमाझी आणि अमित मिश्राची ओळख २०१९ मध्ये इन्स्टाग्रामद्वारे झाली होती. २६ एप्रिल २०२१ रोजी कानपूर क्लबमध्ये लग्न करण्यापूर्वी जवळपास तीन वर्षे आम्ही रिलेशनशिपमध्ये होतो. लग्नानंतर लगेचच माझा नवरा आणि सासरच्या लोकांनी माझ्या कुटुंबावर होंडा सिटी कार आणि हुंडा म्हणून १० लाख रुपये देण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली. लग्नानंतर माझी पाठवणी करताना माझ्या कुटुंबीयांनी २.५ लाख रुपयांची व्यवस्था केली होती. परंतु त्यानंतरही अधिक पैशांची मागणी सुरूच होती.ङ्घअमित दारू पिऊन वारंवार तिला मारहाण करायचा, शिवीगाळ करायचा आणि कधीकधी तिला काही दिवस खायला-प्यायलाही दिलं जात नव्हतं, असे गंभीर आरोप गरिमाने केले आहेत. इतकंच नव्हे तर मॉडेलिंगच्या कामातून मिळालेले पैसे तो हिसकावून घेत असे आणि वारंवार घटस्फोटाची धमकी देत असे, असाही दावा तिने केला आहे. या सततच्या छळामुळे ती नैराश्यात गेली आणि तिला मॉडेलिंगचं करिअरदेखील सोडावं लागलं, असं तिने सांगितलं आहे.

गरिमाने या छळाला वैतागून टोकाचं पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला होता. एकदा फिनाइल पिऊन तिने आत्महत्येचा प्रयत्न केला होता आणि त्यानंतर तिला रुग्णालयात दाखल करावं लागलं होतं. पोलीस आयुक्त कार्यालयासह अनेक वेळा पोलिसांशी संपर्क साधूनही अमित मिश्राच्या प्रभावामुळे एफआयआर नोंदवण्यात आला नाही, म्हणून मी अखेर न्यायालयात धाव घेतली, असं गरिमाने स्पष्ट केलं. तिचे वकील करीम अहमद सिद्दीकी यांनी सांगितलं की, पोलिसांना वारंवार निवेदन देऊनही कोणतीही कारवाई न झाल्याने न्यायालयात ही तक्रार दाखल करण्यात आली.

गरिमाने अमितविरोधात दाखल केलेला हा तिसहा कायदेशीर खटला आहे. याआधी तिने २१ एप्रिल २०२५ रोजी त्याच्याविरुद्ध कौटुंबिक हिंसाचाराचा खटला दाखल केला होता. त्यानंतर २३ एप्रिल २०२५ रोजी तिने नुकसान भरपाईची याचिका दाखल केली होती. या याचिकेत तिने मासिक ५० हजार रुपये भत्ता आणि १ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मागितली होती.



# वयाच्या ५०व्या वर्षी रणदीप हुड्डा झाला बाबा...



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता रणदीप हुड्डा च्या घरी पाळणा हलला असून अभिनेता बाबा होणार आहे. आज, १० मार्च २०२६ रोजी रणदीप हुड्डा आणि त्याची पत्नी एका मुलीचे पालक बनले आहेत. रणदीप हुड्डानं स्वतः सोशल मीडियावर ही आनंदाची बातमी शेअर केली असून त्याच्या मुलीचा वडिलांसोबतचा फोटो शेअर केला आहे.रणदीप हुड्डाची पत्नी लिन लैशरामनं एका मुलीला जन्म दिला आहे. रणदीप हुड्डानं सोशल मीडियावर ही आनंदाची बातमी शेअर केली. रणदीप हुड्डानं शेअर केलेल्या फोटोमध्ये त्याचे वडील रणबीर हुड्डा यांनी त्यांच्या नवजात नातीला हातात धरलेलं दिसत आहेत. आज रणदीपच्या वडिलांचा वाढदिवस आहे. फोटोमध्ये त्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसतोय.रणदीपनं सोशल मीडियावर फोटो शेअर करत लिहिलं की, 'आजोबा आणि नातीला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा. बाबा, आज मी बाबा झाल्यानंतर माझ्या मनात तुमच्याबद्दलचा आदर आणखीनच वाढला आहे. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे लिन, मला बाबा बनवल्याबद्दल आणि आपल्या छोट्या मुलीला या जगात आणल्याबद्दल तुझे खूप खूप आभार. एक चिमुकली मुलगी आणि आयुष्यभराचं प्रेम.'रणदीपच्या पोस्टवर चाहत्यांनी 'अभिनंदन', 'नवीन आयुष्याच्या सुरुवातीसाठी शुभेच्छा' अशा कमेंट्स करत त्याचं अभिनंदन केलं आहे. काही चाहत्यांनी बाळाला 'राजकुमारी' असंही म्हटलं आहे.रणदीप हुडा आणि लिन लैशराम यांनी गेल्या नोव्हेंबरमध्ये सोशल मीडियावर प्रेग्नन्सीची घोषणा केलेली. दरम्यान, रणदीप आणि लिन यांनी २९ नोव्हेंबर २०२३ रोजी मणिपुरी मेईतेई रितीरिवाजांनुसार लग्न केलं. जवळच्या कुटुंबातील सदस्य आणि मित्रांच्या उपस्थितीत या जोडप्यानं त्यांचे लग्नाचे विधी पूर्ण केले. २०११ मध्ये नसीरुद्दीन शाह यांच्या थिएटरमध्ये या जोडप्याची पहिली भेट झाली होती.

# नो-ब्लाउज' एक्सपेरिमेंट, ब्लाऊजविनाच अभिनेत्रीने नेसली बनारसी साडी, पाठीवर रुळला कोट्यवधींचा हार

**मुंबई :** उर्वशी रौतेलाचा 'नो ब्लाऊज' साडी लूक सध्या चर्चेत आहे. तिने बनारसी साडी ब्लाऊजशिवाय नेसून पाठीवरील सुंदर नेकलेस आणि टोन्ड बॅक फ्लॉन्ट केली आहे. तिचा हा बोल्ड आणि युनिक स्टाईल स्टेटमेंट अनेक सेलिब्रिटी फॅशन ट्रेंड्सना आव्हान देत आहे. फॅशन क्वीन उर्वशीचा हा नवा अवतार सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे.बॉलिवूडमध्ये अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्या त्यांच्या चित्रपट कारकिर्दीपेक्षा, कामापेक्षा, त्यांची फॅशन, स्टाईल आणि ड्रेसिंग सेन्समुळेच जास्त चर्चेत येतात. उर्वशी रौतेला ही त्यांच्यापैकीच एक अभिनेत्री. बॉलिवूडची ङ्गफॅशन क्वीनङ्घ मानली जाणारी ही सौंदर्यवती अनेकदा तिची स्टेटमेंट्स आणि बोल्ड लूकमुळे प्रसिद्धी मि ळवते, लाइमलाइटमध्ये असते. आता ती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. उर्वशीच्या नव्या आणि बोल्ड लूकने ऑनलाइन धुमाकूळ माजवला आहे. महागडे पोशाखा, आणि आलिशान जीवनशैलीमुळे अनेकदा चर्चेत राहणाऱ्या या अभिनेत्रीने यावेळी साडी नेसण्याची पद्धत पूर्णपणे बदलली आहे.उर्वशीने नुकताच एक व्हिडीओ शेअर केला होता. तिच्या या लेटेस्ट व्हिडिओमध्ये, उर्वशीने अतिशय सुंदर अशी बनारसी साडी नेसली आहे, पण साडीपेक्षाही सगळ्यात चर्चेत आहे तो तिचा नो ब्लाऊज लूक. यामध्ये तिने ब्लाऊज शिवायच साडी नेसली असून ती स्टायलिशपणे तिची टोन्ड बॅक आणि रुबी नेकलेस फ्लॉन्ट करताना दिसत्ये. या नवीन आणि हॉट फोटोशूटवर अनेकांनी तिचं कौतुक केलं आहे.निळसर रंगाची, अतिशय सुंदर साडी , केसांची आकर्षक हेअरस्टाईल असा उर्वशीचा सुंदर लूक आहे. पण यात पटकन लक्ष वेधलं जातं ते तिच्या नो ब्लाऊज लूकमुळे आणि तिने पाठीवर घातलेल्या नेकलेसकडे. तिने साडी इतक्या स्टायलिश पद्धतीने नेसली की ती एकदम हॉट आणि क्लासी दिसत होती. व्हिडिओमध्ये, उर्वशीने निळ्या आणि सोनेरी रंगाची बनारसी सिल्क साडी परिधान केली होती ज्यामध्ये सोनेरी धाग्यांचा वापर करून फुलांचं भरतकाम करण्यात आलं होतं. उर्वशीने तिची साडी उलटा पल्लू स्टाईलमध्ये नेसली होती. व्हिडिओमध्ये ती तिची पाठ उघडी ठेवून पोज देताना दिसत आहे. तिचा लूक खूपच ग्लॅमरस दिसत होता.खरंतर आपण एखादी ज्वेलरी, हार घालतो तो गळ्याच्या पुढच्या बाजूला असतो. परंतु उर्वशीने एक अनोखा लूक निवडला आहे. अतिशय मौल्यवान माणिक आणि हिऱ्याचा हार उर्वशीने घातला, पण तो गळ्याच्या पुढच्या बाजूला नव्हे तर तो तिच्या पाठीवर रुळत होता. लाल स्टोन्स आणि हिऱ्यांनी जडवलेला हा हार तिच्या पाठीचे सौंदर्य आणखी वाढवत होता. एवढंच नव्हे तर तिने मॅचिंग कानातले देखील घातले होते, ज्यामुळे तिच्या चेहऱ्यावरील चमक आणखी वाढली होती.

तिचा हा सुंदर लूक पूर्ण करण्यासाठी, उर्वशीने तिचे केसांचा हाय बन घातला आणि त्यावर पांढरी फ ुलं माळली होतीय. या विंटेज स्टाईलने तिचा रॉयल लूक वाढवला. मेकअपसाठी, तिने तिच्या पोशाखावर आणि दागिन्यांवर लक्ष केंद्रित करून, ड्यूई बेस, विंग्ड आयलाइनर आणि न्यूड लिपस्टिक निवडली. तिच्या या व्हिडीवर हजारो लाईक्स आले असून अनेकांनी कमेंट करत तिच्या स्टाईलचे कौतुकही केलं.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राजमाता महोत्सव २०२६ ची उत्साहात सांगता पाच दिवसांत ४० लाखांहून अधिक विक्री

जनसंचलन/बुलढाणा

ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद बुलढाणा व कृषि विभाग बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ङ्गराजमाता महोत्सव २०२६फ्क ची सोमवारी (दि. ९) उत्साहात सांगता झाली. हा महोत्सव दि. ५ ते ९ मार्च दरम्यान जिजामाता प्रेक्षागार, क्रीडा व व्यापारी संकुल, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आला होता. महोत्सवाचा शुभारंभ दि. ५ मार्च रोजी केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाला होता. समारोप प्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी संतोष डाबरे, प्रकल्प संचालक पांडुरंग कोल्हे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे(धुळे) तसेच जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रांत जाधव आदी उपस्थित होते. पाच दिवस चाललेल्या या महोत्सवाला शहरी तसेच ग्रामीण भागातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांच्या स्टॉल्ससोबतच खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सना नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. सायंकाळी आयोजित मनोरंजनात्मक कार्यक्रमांनीही महोत्सवात रंगत आणली. विक्री अहवालानुसार पाच दिवसांत महिला बचत गटांच्या उत्पादनांमधून व फ ूड स्टॉल्समधून सुमारे ४० लाख १२ हजार रुपयांची विक्री झाल्याची नोंद आहे. यावेळी जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी महिला दिनानिमित्त उपस्थित महिलांना शुभेच्छा देत महिला उत्पादनांमध्ये वेगळेपण असणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रत्येक उत्पादनाचे वैशिष्ट्ये जपल्यास त्याची मागणी वाढू शकते, असे त्यांनी नमूद केले. तसेच महिलांच्या उत्पादनांना ई-मार्केटिंग प्लॅटफॉर्मवर आणणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. ङ्गएक जिल्हा एक उत्पादनफ उपक्रमांतर्गत बिजोत्पादनाबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी कृषि विभागाने उभारलेल्या स्टॉल्सचे कौतुक केले. भविष्यात बुलढाणा जिल्ह्याच्या उत्पादनांचा स्वतंत्र ब्रँड निर्माण करून त्या उत्पादनाला व्यापक ओळख मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले. समारोपावेळी १३ तालुक्यांमधून सर्वेक्षण अहवालानुसार निवडलेल्या उत्कृष्ट १० उत्पादन गटांना प्रशस्तीपत्र



देऊन सन्मानित करण्यात आले. त्यापैकी तीन गटांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा येथील सातपुडा उत्पादक समूहाच्या रजनी उमेश वेरूळकर यांच्या पेटीकोट उत्पादनाला मिळाला. त्यांना प्रशस्तीपत्रासह १० हजार रुपये बक्षीस देण्यात आले. द्वितीय क्रमांक नांदुरा तालुक्यातील वडाळी येथील समृद्धी महिला समूहाच्या प्रियंका मनोज वकटे यांच्या बॉलपेन व घासणी उत्पादनाला मिळाला. त्यांना ७ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. तृतीय क्रमांक मलकापूर तालुक्यातील वरखेड येथील सावित्रीबाई फुले समूहाच्या पूजा नंदकिशोर देशमुख यांच्या पापड व चिप्स उत्पादनाला मिळाला. त्यांना ५ हजार रुपये बक्षीस देण्यात आले. पाच दिवस चाललेल्या या महोत्सवाने महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देत त्यांच्या उद्योजकतेला चालना दिली.

# इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅसच्या अवैध वापरावर कारवाई

जनसंचलन/बुलढाणा

सध्याच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन तुटवडा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसून गॅस इंधनाच्या दरात वाढ होण्याचीही शक्यता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर घरगुती गॅसचे वितरण सुरळीत राहावे तसेच त्याचा अवैध वापर रोखण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना सुरू केल्या आहेत. जिल्हा व तालुकास्तरीय दक्षता व फिरते पथक स्थापन करण्यात आले असून ही पथके अचानक तपासणी करणार आहेत.शासन निर्णयान्वये घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी तसेच वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राहण्यासाठी तालुकास्तरीय तसेच जिल्हास्तरीय दक्षता व फिरते पथक स्थापन करण्यात आले असून ही पथके गॅस एजन्सींची अचानक तपासणी (सप्राईज इन्स्पेक्शन) करणार आहेत. सध्याच्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन काही ठिकाणी इंधनाचा अवैध साठा किंवा काळाबाजार होण्याची शक्यता लक्षात घेता अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. घरगुती गॅसचा व्यावसायिक किंवा इतर अवैध कामांसाठी वापर करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच घरगुती गॅसचा आवश्यक तेवढाच वापर करावा, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी केले आहे.

# विभागीय हातमाग कापड स्पर्धा २४ मार्च रोजी; नागपूर येथे २० मार्चपर्यंत नमुने सादर करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने हातमाग विणकरांनी विणलेल्या उत्कृष्ट हातमाग कापड नमुन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विभागीय हातमाग कापड स्पर्धा सन २०२५२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा विभागीय आयुक्त नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २४ मार्च २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग) कार्यालय, नागपूर येथे होणार आहे. अमरावती व नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांतील हातमाग विणकरांनी या स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी विणकरांनी तयार केलेले हातमाग कापडाचे नमुने दि. २० मार्च २०२६ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग), नवीन प्रशासकीय इमारत क्र. २, ८ वा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांच्या कार्यालयात सादर करावेत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग) कार्यालय, नागपूर येथे ०७१२-२५६७२९७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.


# जिजाऊंच्या जन्मभूमीत मेडिकल कॉलेज; मग नावही राजमाता जिजाऊंचेच हवे!

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्याच्या अस्मितेशी निगडित असलेल्या महत्त्वाच्या मागणीला आता राजकीय जोर मिळताना दिसत आहे. केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देत बुलढाणा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला स्वराज्य जननी जिजाबाई यांचे नाव देण्याची ठाम मागणी केली आहे. जिल्ह्यातील सिंदखेड राजा हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराज यांचे आजोळ आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांचे जन्मस्थान म्हणून संपूर्ण देशभर ओळखले जाते. अशा ऐतिहासिक आणि गौरवशाली भूमीत उभे राहणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला जिजाऊंचे नाव देणे ही केवळ नामकरणाची बाब नसून जिल्ह्याच्या इतिहासाचा आणि स्वाभिमानाचा सन्मान असल्याचे प्रतापराव जाधव यांनी पत्रात नमूद केले आहे. जिल्ह्यातील जनतेचीही हीच भावना असून राष्ट्रमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बुलढाणाफ्क असे नाव देऊन जिजाऊंच्या कार्याला अभिवादन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जनभावनेचा आदर करून या मागणीवर सकारात्मक निर्णय घेतील, अशी अपेक्षाही जाधव



यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, ही मागणी मान्य झाल्यास बुलढाणा जिल्ह्यासाठी तो ऐतिहासिक आणि अभिमानाचा क्षण ठरणार असल्याची चर्चा जिल्ह्यात सुरू झाली आहे.



# ग्रामीण भागाकडे अर्थसंकल्पात दुर्लक्ष; शेतकरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी ठोस तरतूद नाही - आमदार सिद्धार्थ खरात

**जनसंचलन/मेहकर**

राज्याच्या अर्थसंकल्पावर बोलताना शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांनी ग्रामीण भाग, शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे सरकारने पुरेसे लक्ष दिले नसल्याची टीका केली. त्यांनी सांगितले की अर्थसंकल्पात मोठमोठ्या योजना आणि आकडेवारी मांडली असली तरी प्रत्यक्षात ग्रामीण भागाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या योजनांना आणि निधीला पुरेसे महत्त्व दिलेले दिसत नाही. आमदार सिद्धार्थ खरात पुढे म्हणाले की, अर्थसंकल्पात शेतीसंबंधित अनेक घोषणा केल्या गेल्या आहेत. कृषी क्षेत्रासाठी सुमारे पाच अब्ज डॉलरच्या उद्दिष्टाचा उल्लेख करण्यात आला आहे तसेच पंधरा पिकांसाठी एकात्मिक मूल्यसाखळी उभारण्याचा संकल्प मांडण्यात आला आहे. शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता () आधारित डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. याशिवाय हवामान अंदाज, बाजारभाव यासंदर्भातील माहिती शेतकऱ्यांना देण्याचेही सांगितले आहे. त्यांनी सांगितले की ङ्कङ्कॲग्रो स्टॅकफ्फ अंतर्गत नोंदणीची प्रक्रिया सुरू असून सुमारे एक कोटीहून अधिक शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. भविष्यात तीन कोटी शेतकऱ्यांना या प्लॅटफॉर्मशी जोडण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. व्हिडिओ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची योजनाही यामध्ये समाविष्ट असल्याचे सांगण्यात आले. मात्र या सर्व घोषणांमध्ये ग्रामीण भागाच्या पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्याचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी नमूद केले. ते म्हणाले की मुंबई-पुणे आणि इतर मोठ्या शहरांतील मेट्रो, उन्नत मार्ग, द्रुतगती महामार्ग यांसारख्या प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात चर्चा आणि निधी दिला जातो. शहरांसाठी स्पष्ट आराखडे तयार केले जातात आणि त्यासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला जातो. परंतु ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी ठोस योजना आणि निधी अर्थसंकल्पात दिसून येत नाही. ङ्कङ्कशहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असताना ग्रामीण भाग मात्र मागे पडत आहे. शहरांसाठी उदारपणे निधी दिला जातो, परंतु ग्रामीण भागासाठी आवश्यक असलेल्या योजनांना पुरेसा निधी मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात असंतोष निर्माण होत आहे,फ्फ असेही त्यांनी सांगितले. अर्थसंकल्पातील आकडेवारी स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की राज्याचा एकूण अर्थसंकल्प सुमारे सात लाख कोटी रुपयांच्या आसपास असला तरी प्रत्यक्ष खर्चासाठी उपलब्ध असलेली तरतूद सुमारे दोन लाख ८८ हजार कोटी रुपयांच्या आसपास आहे. हीच रक्कम विविध विभागांना खर्चासाठी दिली जाते. मात्र अनेक वेळा विभागांना दिलेली तरतूद पूर्णपणे खर्च होत नाही आणि त्यामुळे योजनांची अंमलबजावणी अपेक्षेप्रमाणे होत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. विभागनिहाय तरतुदींचा उल्लेख करताना आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की महिला व बालविकास विभागासाठी सुमारे २४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ऊर्जा विभागासाठी सुमारे २७ हजार कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागासाठी सुमारे २६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र या निधीचा ग्रामीण भागाच्या विकासासाठी किती उपयोग होतो याकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण विकास विभागाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, रोजगार आणि आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणात योजना राबविण्याची गरज आहे. मात्र अर्थसंकल्पात या विभागासाठी अपेक्षित तेवढी तरतूद दिसत नाही. दुग्ध व्यवसायाबाबतही त्यांनी सरकारवर टीका केली. महाराष्ट्रात दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी केवळ प्रती लिटर एक रुपया प्रोत्साहन देण्याची घोषणा करण्यात आली आहे. पूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मंत्री असताना राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ () सोबत करार करून मराठवाडा आणि विदर्भातील दुग्ध व्यवसाय वाढविण्यासाठी प्रयत्न केले होते. परंतु सध्याच्या अर्थसंकल्पात दुग्ध व्यवसायाला पुरेशी मदत मिळालेली दिसत नाही, असे त्यांनी सांगितले. शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरही त्यांनी सरकारकडे स्पष्टता मागितली. ते म्हणाले की मुख्यमंत्री यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत घोषणा केली असली तरी त्यामध्ये नेमकी कोणत्या प्रकारच्या कर्जाचा समावेश असेल याबाबत स्पष्टता नाही. पिक कर्जासोबतच ट्रॅक्टर, स्प्रिंकलर किंवा शेतीशी संबंधित इतर साधनांसाठी घेतलेल्या कर्जाचाही समावेश कर्जमाफीमध्ये करावा, अशी मागणी त्यांनी केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुद्दा मांडताना आमदार खरात यांनी सांगितले की महाराष्ट्रातील काही मोजक्या जिल्ह्यांमध्येच प्रति व्यक्ती उत्पन्न जास्त आहे. मुंबई, पुणे आणि काही औद्योगिक जिल्ह्यांमध्ये उत्पन्न जास्त असले तरी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये प्रति व्यक्ती उत्पन्न खूपच कमी आहे. राज्यातील सुमारे अकरा जिल्ह्यांचे प्रति व्यक्ती उत्पन्न हे राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे आणि काही जिल्ह्यांचे उत्पन्न देशाच्या सरासरीपेक्षाही कमी आहे. ङ्कङ्कमहाराष्ट्र प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. मात्र प्रत्यक्षात राज्यातील फक्त काही जिल्हेच आर्थिकदृष्ट्या पुढे आहेत. उर्वरित अनेक जिल्हे अजूनही विकासापासून दूर आहेत. त्यामुळे ग्रामीण भाग आणि मागास जिल्ह्यांच्या विकासासाठी स्वतंत्र व ठोस योजना आखण्याची गरज आहे,फ्फ असे आमदार सिद्धार्थ खरात यांनी आपल्या भाषणात नमूद केले.




# सर्पमित्राचा जीव गेला पण ॲम्ब्युलन्सला हवे होते पैसे!
# बुलढाण्यात ॲम्ब्युलन्सचा पैशांचा खेळ? पतसंस्था-प्रतिष्ठानच्या नावावर ५ ते २० हजारांची वसुली!

**जनसंचलन/बुलढाणा**

जीव वाचवण्यासाठी आयुष्यभर धावणाऱ्या सर्पमित्राचा शेवट मात्र पैशांच्या निर्दयी खेळात झाला, ही अत्यंत संतापजनक आणि काळीज पिळवटून टाकणारी घटना खामगाव तालुक्यातील जनुना येथे समोर आली आहे. साप पकडून जंगलात सोडताना झालेल्या सर्पदंशानंतर मंगेश प्रकाश कांबळे (वय ३२) यांना तातडीने उपचारासाठी अकोल्याकडे नेले जात होते. मात्र, खिशात पुरेसे पैसे नसल्याचे कारण देत ॲम्ब्युलन्स चालकाने रुग्णवाहिका अर्ध्या वाटेतूनच परत फिरवल्याचा धक्कादायक आरोप नातेवाईकांनी केला आहे. या अमानुष प्रकारामुळे उपचाराला विलंब झाला आणि यातच मंगेशचा मृत्यू झाल्याचा संतापजनक आरोप कुटुंबीयांनी केला आहे. जनुना गावातील मंगेश कांबळे हे धाडसी आणि तत्पर सर्पमित्र म्हणून ओळखले जात होते. गावात कुठेही साप दिसला की, स्वतःच्या जीवाची पर्वा न करता ते धावत पोहोचायचे. अनेक वेळा विषारी साप पकडून सुरक्षितपणे जंगलात सोडत त्यांनी अनेकांचे जीव वाचवले होते. पण आज त्याच सर्पमित्राला वेळेत उपचार मिळाले नाहीत आणि पैशांच्या अडथळ्यामुळे त्यांचा जीव गेला, ही बाब समाजाला हादरवणारी आहे. दरम्यान, या घटनेनंतर नातेवाईकांनी संबंधित ॲम्ब्युलन्स चालकावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाईची मागणी केली आहे. मंगेशमुळे अनेकांचे जीव वाचले पण आज त्यालाच मदत मिळाली नाही,फ्फ अशा शब्दांत गावकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. या प्रकरणानंतर बुलढाणा जिल्ह्यातील ॲम्ब्युलन्स व्यवस्थेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही मोजके सेवाभावी चालक सोडले तर अनेक खाजगी ॲम्ब्युलन्स, काही प्रतिष्ठान, पतसंस्था आणि राजकीय पुढाऱ्यांच्या नावावर चालणाऱ्या ॲम्ब्युलन्सकडून ५ हजार ते २० हजार रुपयांपर्यंत मनमानी शुल्क आकारले जात असल्याचे वास्तव समोर येत आहे. गरीब रुग्णांच्या जीवाशी असा पैशांचा खेळ थांबणार कधी? असा संतप्त सवाल आता जनतेतून विचारला जात असून प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून या बेकायदेशीर वसुलीवर लगाम लावण्याची मागणी जोर धरू लागली आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८